नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३
सरकार –वि– राहुल चौधरी
नि.क्र. ३३१

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १५ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव — संतोष समाधान गावंडे,
वय. ५९ वर्षे, व्यवसाय — शेती,
राहणार – आडसुळ, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. दि. ११.०५.२०२३ रोजी मी शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पंचनामा करण्याकरीता गेलो नव्हतो. आरोपी चेतना जावळे हिच्या मोबाईलमधून स्क्रीन शॉट जप्त करायचे असल्यामुळे तुम्ही पंच म्हणून हजर रहा असे पोलीसांनी मला सांगितले नव्हते. मी सही लिहिलेल्या कागदावर केली होती. लिहिलेल्या कागदावर काय लिहिले होते हे मला माहिती नाही. मला आता स्क्रीन शॉट जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. २ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.३३२** देण्यात येतो. दि. २२.०५.२०२४ रोजी एक धनादेश व महालक्ष्मी नोटबुक असे नाव असलेले एक बुक जप्त करण्यासाठी पोलीसांनी पंच म्हणून हजर राहण्यास मला सांगितले नव्हते. माझ्या समक्ष आरोपीकडून एक धनादेश व महालक्ष्मी नोटबुक लिहिलेली एक बुक अशा दोन वस्तु जप्त करण्यात आल्या नव्हत्या. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. १ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. त्याला **नि.क्र.३३३** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११.०५.२०२३ रोजी मी शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पोलीसांसोबत पंच म्हणून हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष चेतना जावळे यांचा मोबाईल तपासून त्यांचे स्क्रीन शॉट काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, स्क्रीन शॉटची प्रिंट काढून त्यावर माझ्या सह्या घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावरुन पोलीसांनी माझ्या समक्ष स्क्रीन शॉट जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.०५.२०२४ रोजी मी शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे पंचनाम्यासाठी पंच म्हणून हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपी पुनम चौधरी हिच्याकडून पंचनात्यात नमुद असलेले दोन धनादेश व महालक्ष्मी नोटबुक लिहिलेली एक नोटबुक जप्त केली होती. हे म्हणणे

खरे नाही की, त्यानंतर जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. मी राहुल चौधरी याला ओळखत नाही. या प्रकरणातील इतर आरोपींना सुध्दा मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी सर्व आरोपींना ओळखत असून त्यांच्या सांगण्यावरुन त्यांना शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. १ व ५ तर्फे श्री. संजय तेलगोटे, वकील यांनी नाकारला.**

**उलटतपास आरोपी क्र. ६ तर्फे श्री. जी. व्ही. पिसे, वकील यांनी नाकारला.**

**आरोपी क्र. २ ते ४ यांनी साक्षीदाराला काही विचारयचे नसल्याचे सांगितल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. १४.११.२०२५ | दि. १४.११.२०२५ |